सकाळ

# कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना 'फेलो ऑफ दि सोसायटी' पुरस्कार



डॉ. दिंगबर शिर्के

कोल्हापूर, ता. १२ : इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्सतर्फे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू आणि ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर शिर्के यांना 'फेलो ऑफ दि सोसायटी' हा सन्मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'संख्याशास्त्र आणि वारंवारिता क्षेत्राच्या प्रगती आणि विकासात दिलेल्या लक्षणीय योगदाना'बद्दल हा पुरस्कार बहाल करण्यात येत असल्याचे संस्थेच्या प्रमाणपत्रात म्हटले आहे.

आंध्र प्रदेशातील तिरुपती मुख्यालय असणाऱ्या इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स (आयएसपीएस) आणि कोचीन येथील कोचीन युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने कोचीन येथे संस्थेची ४२ वी वार्षिक परिषद झाली. यावेळी हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्याचे नियोजन होते. तथापि, या काळात पूर्वनियोजित महत्त्वपूर्ण बैठकीस उपस्थित राहावयाचे असल्याने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या अनुपस्थितीत पुरस्काराची घोषणा केली. नुकतेच डॉ. शिर्के यांना या पुरस्काराचे मानपत्र व प्रमाणपत्र मिळाले आहे.

> संख्याशास्त्र विषयामध्ये कार्य करणाऱ्या 'आयएसपीएस'सारख्या अत्यंत आघाडीच्या संस्थेने दाखविलेल्या या विश्वासामुळे जबाबदारी वाढली आहे. ३५ वर्षांमध्ये शिक्षक, संशोधक म्हणून जे योगदान देत राहिलो, त्याचे फलितस्वरूप म्हणजे हा पुरस्कार आहे. मी अत्यंत कृतज्ञ भावनेने तो स्वीकारत आहे. माझे या क्षेत्रातील सहकारी, संशोधक आणि विद्यार्थी यांचेही यामध्ये महत्त्वाचे सहकार्य आहे. त्या सर्वांनाही या क्षणी धन्यवाद देतो.
>
> **-डॉ. दिंगबर शिर्के**, कुलगुरू

तरुण भारत


# ‘फेलो ऑफ दी सोसायटी’ पुरस्काराने कुलगुरू डॉ. शिर्के यांचा सन्मान

▪ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी मानले संस्थेचे आभार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू आणि ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर शिर्के यांना इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स या संख्याशास्त्रातील राष्ट्रीय आघाडीच्या संस्थेकडून ‘फेलो ऑफ दि सोसायटी’ हा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. ‘संख्याशास्त्र आणि वारंवारिता क्षेत्राच्या प्रगती आणि विकासात दिलेल्या लक्षणीय योगदानाबद्दल हा पुरस्कार बहाल करण्यात येत असल्याचे संस्थेच्या प्रमाणपत्रात म्हटले आहे.

आंध्र प्रदेशातील तिरुपती मुख्यालय इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स (आयएसपीएस) आणि कोचीन येथील कोचीन युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने कोचीनमध्ये झालेल्या ४२ वी वार्षिक परिषदेत कुलगुरू डॉ. शिर्के यांना



‘फेलो ऑफ दि सोसायटी“ हा पुरस्कार प्रदान करण्याचे नियोजन होते. परंतु पूर्वनियोजित महत्त्वपूर्ण बैठकीमुळे त्यांना उपस्थित राहता आले नाही. त्यांच्या अनुपस्थितीत पुरस्काराची घोषणा करण्यात आली. कुलगुरू तथा संख्याशास्त्रज्ञ डॉ. शिर्के यांनी संख्याशास्त्र व वारंवारिता या क्षेत्रांच्या विकासामध्ये गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. डॉ. शिर्के म्हणाले, गेल्या ३५ वर्षांमध्ये शिक्षक, संशोधक म्हणून जे योगदान देत राहिलो, त्याचे फलितस्वरुप म्हणजे हा पुरस्कार असून, तो मी अत्यंत कृतज्ञ भावनेने स्वीकारत आहे..

जनसंपर्क कक्ष

13 JAN 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




शिवाजी विद्यापीठात मुख्य प्रशासकीय भवनामध्ये गुरुवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून, अभिवादन करण्यात आले.

# विवेकानंद, राजमाता जिजाऊंना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती गुरुवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून, अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, आजीवन अध्ययन विभागाचे डॉ. रामचंद्र पवार, डॉ. एस. एन. सपली, आदी उपस्थित होते.

सकाळ



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमापूजन प्रसंगी उपस्थित मान्यवर.

# शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मुख्य प्रसासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, आजीवन अध्ययन विभागाचे डॉ. रामचंद्र पवार, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. एस. एन. सपली उपस्थित होते.

13 JAN 2023 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पारंपरिक शेतीबरोबरच कंदमुळे लावा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; कंदमुळांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन

कोल्हापूर, ता. १२ : 'निसर्गात उपलब्ध असणाऱ्या कंदमुळांची ओळख आणि माहिती सगळ्यांना होण्यासाठी, असे प्रदर्शन भरवणे आवश्यक आहे. पारंपरिक शेतीबरोबरच शेतकऱ्यांनी कंदमुळे आपल्या शेतीत लावावी,' असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

दुर्मिळ रानकंदमुळांची ओळख, आहारातील वापराबद्दलची माहिती व्हावी या हेतूने 'निसर्ग अंकुर'च्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर वुई केअर, एनजीओ कंपॅशन २४ संस्थेने कंदमुळांचे प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते याचे उद्‌घाटन झाले. या वेळी ते बोलत होते. श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, गार्डन्स क्लब, वुई केअर हेल्पलाईन, यूथ अॅनेक्सतर्फे शहाजी कॉलेजमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात कंदमुळांच्या या उत्सवास प्रारंभ झाला. उद्यापर्यंत (ता. १३) हे प्रदर्शन असेल. सकाळी १० ते सायंकाळी पाचपर्यंत प्रदर्शन खुले राहील. आज दिवसभर शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, विज्ञानाचे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिकांनी कंद पाहण्यासाठी गर्दी केली. डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठातील तज्ज्ञ आणि आयोजकांनी एकत्र येऊन कंदमुळांच्या संशोधनावर भर देऊन त्याची प्रायोगिक तत्त्वावर शेती करावी. कंदमुळांच्या पेटंटवर चर्चा करून भविष्यात असे प्रकल्प साकारू या.'

'कोल्हापूर वुई केअर'चे अध्यक्ष मिलिंद धोंड यांनी सूत्रसंचालन केले. 'गडहिंग्लज'चे प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे, डॉ. डी. आर. मोरे, कृषी अधिकारी उमेश पाटील, डॉ. मधुकर बाचूळकर, शहाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, मोहन माने, 'केएमए'च्या अध्यक्ष गीता पिल्लाई, मंजिरी कापडेकर, कल्पना सावंत, अमृता वासुदेवन, जयेश ओसवाल, सुशांत टकळक्की प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : कंदमुळे प्रदर्शनाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे, उमेश पाटील, गीता पिल्लई, प्राचार्य मधुकर बाचूळकर डॉ. अशोक वाली, डी. आर. मोरे, मिलिंद धोंड, जयेश ओसवाल. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)**

### अबब... केवढे मोठे कंद..!

■ प्रदर्शनात ६० पेक्षा अधिक कंदमुळे ठेवली आहे. शेतीत लागवड केलेली ही कंदमुळे आहेत. यामध्ये पिल्ला कोन, मुन्द चिरके, कणगा, काटे कणग, कोराडू, उंडे, शेंडवाळे, आडकोळी, तांबडे कणवाल, तांबडे सावर, सुकाळी कोन सारख्या दुर्मिळ कंदमुळांचा समावेश आहे. ६० प्रकारच्या कंदांपैकी १५ ते २० प्रकारचे कंद विक्रीसाठी उपलब्ध आहेत. खूप लोकांनी असे कंद विकत घेतले. सुमारे सहा ते सात प्रकारच्या कंदाच्या पाककृतीची माहिती उपस्थितांना दिली.

13 JAN 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कंदमुळांचा उत्सव, नागरिकांची लागली रीघ

## राज्यातील पहिलेच प्रदर्शन : दुर्मीळ ६० रानकंदमुळांचा समावेश; 'निसर्ग अंकुर'चा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : डुक्कर कंद, पिल्ला कोन, मुन्द चिरके, कणगा, काटे कणग, कोराडू, उंडे, शेंडवाळे, आडकोळी, तांबडे कणवाल, तांबडे सावर, सुकाळी कोन अशा ६० दुर्मीळ रानकंदमुळांचे प्रदर्शन येथील शहाजी महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात भरवण्यात आले आहे. हे प्रदर्शन पाहण्यासाठी दिवसभरात हजारो नागरिकांची रीघ लागली होती.

निसर्ग अंकुर या संस्थेमार्फत कोल्हापूर वुई केअर आणि एनजीओ कंपॅशन २४ ह्या संस्थेने भरवलेल्या या कंदमुळांच्या उत्सवाचे उद्घाटन गुरुवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. शाहू छत्रपती शिक्षण संस्था, गार्डन्स क्लब कोल्हापूर, वुई केअर हेल्पलाईन, युथ एनेक्स यांच्या सहकार्याने या प्रदर्शनास प्रारंभ झाला.

### खवय्यांसाठी कंदमुळांचे पदार्थ उपलब्ध

१५ ते २० प्रकारचे कंद विक्रीसाठी उपलब्ध असून, यातील ६ ते ७ प्रकारच्या कंदाच्या पाककृती उपलब्ध आहेत. हौशी खवय्यांना कंदापासून तयार केलेल्या विविध पदार्थांची चवही चाखता आली. हे प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत खुले राहणार असून, आज अखेरचा दिवस आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी निसर्गात उपलब्ध असणाऱ्या कंदमुळांची ओळख आणि माहिती सगळ्यांना होण्यासाठी अशी प्रदर्शन भरवणे आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यापीठात तज्ज्ञ आणि आयोजकांनी एकत्र येऊन कंदमुळांची प्रायोगिक तत्त्वावर शेती करावी, त्याचे पेटंट घ्यावे, तसेच याविषयी भविष्यात प्रकल्प करू, असे आश्वासनही दिले. मिलिंद धोंड यांनी ह्या उपक्रमाचा उद्देश सांगितला.

यावेळी गडहिंग्लजचे प्रांताधिकारी बाबासाहेब वाघमोडे, शिवाजी विद्यापीठाचे माजी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, कृषी अधिकारी प्राचार्य उमेश पाटील, ज्येष्ठ वनस्पतीतज्ज्ञ डॉ. मधुकर बाचूळकर, शहाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, मोहन माने, गीता पिल्लई, मंजिरी कपडेकर, कल्पना सावंत उपस्थित होते.